प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

## संक्षिप्त



### सीएटीसी २२३ कँपचे आयोजन

**उमरगाः** तरुण देशाचे भविष्य आहेत. आजच्या युगात तरुणांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो आहे. तंत्रज्ञानाचा वेगवान विकास, जागतिकीकरण, वाढती स्पर्धा, बेरोजगारी ही काही प्रमुख आव्हाने आहेत. या आव्हानांना तोंड देत अभ्यास केला तर देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावता येवू शकते असे मत सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराटे यांनी व्यक्त केले.शहरातील भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात ५३ महाराष्ट्र, बटालियन एनसीसी लातूर, यांच्या वतीने शनिवारी,(दि २९) आयोजित सीएटीसी - २२३ कँप मध्ये भराटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लेफ्टनंट कर्नल वाय बी सिंग होते. यावेळी पोलिस उप निरीक्षक अनुसया माने, प्रतीक्षा पांगे उपस्थित होते. युवकांना एनसीसी च्या माध्यमातुन देश व समाजाची सेवा करण्यासाठी आत्मविश्वास, कठिण परिश्रम, अभ्यासातील सातत्य याचे अनुपालन करून चांगल्या व्यक्तिमत्व विकास महत्वाचा असल्याचे सांगितले. तर पोउपनि अनुसया माने म्हणाल्या की, पोक्सो कायदा आणि महिलांचे कायदे हे दोन्ही भारतीय समाजात महिलांचे आणि बालकांचे संरक्षण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असल्याचे सांगून याबाबत माहिती दिली. तर प्रतीक्षा पांगे यांनी वाढत्या सायबर गुन्हेगारी याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले. कार्यक्रमाला सुभेदार मेजर शंभू सिंग, लेफ्टनंट के डब्ल्यू पावडे, मधुबाला आंधळे, संदिप चव्हाण आदीसह पोलीस कर्मचारी व एनसीसी कॅडेटस मोठ्या संख्येने उपस्थित होते.